दैनिक
# महाराष्ट्र जीत
मुख्य संपादक : सागरा राणा अंभोरे    संपादक : बंडूभाऊ इंगोले
RNI No - MHMUL/25/A0788
■ वाशीम  ■ सोमवार, १९ जानेवारी २०२६  ■ वर्ष : २  ■ अंक : २८३  ■ पाने : ४  ■ किंमत : ५ रूपये  ■ Title code:- MAHMUL039353

## वडघर जिल्हा परिषद व करंजाडे पंचायत समिती साठी शिवसेनेने कसली कंबर

**पनवेल (वार्ताहर) :** उरण विधानसभा मतदारसंघातील वडघर जिल्हा परिषद व पंचायत समिती साठी शिवसेनेने कसली कंबर असून त्या दोन्ही जागेवर शिवसेनेकडून उमेदवार लढण्यास इच्छूक आहे.राज्य निवडणूक आयोगाने रायगड जिल्हा परिषद पनवेल आणि उरण पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला असून गुरुवार ५ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान होणार असून ७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतमोजणी होणार आहे. पनवेल तालुक्यात ८ जिल्हा परिषद गट व १६ पंचायत समिती गण तर उरण तालुक्यात ४ जिल्हा परिषद गट व ८ पंचायत समिती गण आहेत. यामध्ये आरक्षण सोडतीत उरण विधानसभा मतदारसंघातील वडघर जिल्हा परिषदसाठी सर्वसाधारण स्त्री साठी तर करंजाडे पंचायत समिती नागरिकांचा मागास प्रवर्ग साठी राखीव झाला आहे. या दोन्ही जागांसाठी शिवसेनेकडून इच्छूकांशी बोलणी सुरु आहे. राजकीय तसेच सामाजिक क्षेत्रात आपल्या कामाचा दबदबा राखणारे त्याचप्रमाणे सकल मराठा समाजाच्या विविध आंदोलनांत सक्रिय सहभाग घेऊन नेतृत्व करणारे शिवसेना जिल्हा प्रमुख विनोद साबळे यांच्या पत्नी व करंजाडे ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच राजश्री विनोद साबळे तसेच शिवसेनेचे करंजाडे शहर प्रमुख मिरेंद्र शाहारे यांच्या पत्नी व करंजाडे ग्रामपंचायत सदस्य प्रिती मिरेंद्र शहारे या दोघींनी वडघर जिल्हा परिषदसाठी शिवसेनेकडून लढवण्यासाठी इच्छूक असल्याची गोष्ट वरिष्ठांच्या कानावर घातली आहे. तर करंजाडे पंचायत समिति साठी शिवसेनेचे वडघर विभागप्रमुख रवि पाटील व उपतालुकाप्रमुख गौरव गायकवाड इच्छुक आहेत. यासंबंधी पक्षश्रेष्ठी काय निर्णय घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## ज्येष्ठ नागरिकाचा अपघाती मृत्यू


**पनवेल (वार्ताहर) :** खारघर मधील उत्सव सर्कल जवळ भरधाव सिमेंट काँक्रिट बल्करने मोटारसायकलला धडक दिल्याने झालेल्या अपघातात मोटारसायकलवरील व्यक्ती सिमेंट बल्करच्या चाकाखाली आल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. खारघर पोलिसांनी या अपघाताला जबाबदार असलेल्या सिमेंट बल्कर चालकाविरोधात गुन्हा दाखल करुन त्याला ताब्यात घेतले आहे.या अपघातात मृत झालेल्या व्यक्तीचे नाव अशोक मादापाटील (६६) असे असून ते खारघर, सेक्टर-१२ मधील सनसफल सोसायटीत कुटुंबासह राहत होते. अशोक मादापाटील कामानिमित्त आपल्या मोटारसायकलवरुन सेंट्रल पार्क कडून खारघर हायवेकडे जात होते. यावेळी उत्सव चौकातील वळणावर सिमेंट बल्कर वाहनाने त्यांच्या मोटारसायकलला धडक दिली. त्यामुळे ते मोटारसायकलसह सिमेंट बल्करखाली आले. या अपघातात अशोक मादापाटील गंभीर जखमी झाल्याने त्यांचा काही वेळातच मृत्यू झाला. या अपघातानंतर खारघर पोलिसांनी सिमेंट बल्कर वाहन चालकाविरोधात गुन्हा दाखल करुन त्याला ताब्यात आहे.

# कर्तव्यपथावर महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचा जयघोष

### प्रजासत्ताक दिनी अवतरणार आत्मनिर्भर 'गणेशोत्सवा'चा भव्य चित्ररथ

**नवी दिल्ली :** ७७ व्या प्रजासत्ताक दिन सोहळ्यासाठी राजधानी नवी दिल्ली सज्ज झाली आहे. राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम्'ला १५० वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने यंदा हा सोहळा ऐतिहासिक ठरणार आहे. या भव्य संचलनात महाराष्ट्राचा चित्ररथ 'गणेशोत्सव : आत्मनिर्भरतेचे प्रतीक' या संकल्पनेतून राज्याची परंपरा आणि आर्थिक शक्तीचे दर्शन अवघ्या जगाला घडवणार आहे.

संरक्षण सचिव राजेश कुमार सिंह यांनी या सोहळ्याच्या तयारीची अधिकृत माहिती दिली. यंदाच्या सोहळ्याला युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष अँटोनियो कोस्टा आणि युरोपियन कमिशनच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डेर लेयन हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या उपस्थितीत कर्तव्यपथावर भारताच्या लष्करी सामर्थ्यासोबतच सांस्कृतिक समृद्धीचे प्रदर्शन होईल.



यंदाच्या संचलनात सहभागी होणाऱ्या एकूण ३० चित्ररथांमध्ये महाराष्ट्राचा चित्ररथ आकर्षणाचे केंद्र ठरणार आहे. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवातून जी सामाजिक क्रांतीची बीजे पेरली, तीच चळवळ आज आधुनिक भारताला कशी 'आत्मनिर्भर' बनवत आहे, याचे प्रभावी चित्रण यात पाहायला मिळेल. गणेशोत्सवाच्या माध्यमातून होणारी कोट्यवधींची आर्थिक उलाढाल, मूर्तिकार आणि सजावट कलाकारांना मिळणारा रोजगार आणि त्यातून विणली गेलेली आर्थिक साखळी या चित्ररथातून मांडली जाणार आहे. तसेच, महाराष्ट्राची अस्मिता असलेली ढोल-ताशा पथके आणि सामाजिक एकात्मता यातून 'एक भारत, श्रेष्ठ भारत'चा संदेश दिला जाईल.

लष्करी ताकदीच्या प्रदर्शनात यंदा प्रथमच 'बॅटल ॲरे' (Battle Array) ही युद्ध रचना प्रदर्शित केली जाणार आहे. यामध्ये अर्जुन टँक, टी-९० भीष्म, राफेल विमाने आणि स्वदेशी बनावटीच्या अत्याधुनिक शस्त्रास्त्रांचे चित्तथरारक दर्शन घडवले जाईल. संचलनात १८ लष्करी तुकड्या आणि १३ बँड्ससह एकूण ३० चित्ररथ सहभागी होतील. २,५०० कलाकारांच्या सांस्कृतिक सादरीकरणाला ऑस्कर विजेते संगीतकार एम.एम. कीरावानी यांचे संगीत आणि ज्येष्ठ अभिनेते अनुपम खेर यांचा भारदस्त आवाज लाभणार आहे.

यंदाचा सोहळा 'जनभागीदारी'वर आधारित असून, १०,००० विशेष पाहुण्यांना निमंत्रित करण्यात आले आहे. यात इस्रोचे शास्त्रज्ञ, लखपती दीदी आणि प्रगत शेतकऱ्यांचा समावेश आहे.

नागरिकांच्या सुविधेसाठी 'राष्ट्रपर्व' हे विशेष पोर्टल आणि ॲप विकसित करण्यात आले असून, तिकीटधारकांसाठी दिल्ली मेट्रोचा प्रवास मोफत ठेवण्यात आला आहे. संचलनानंतर २६ ते ३१ जानेवारी दरम्यान लाल किल्ल्यावर 'भारत पर्व'चे आयोजन करण्यात आले असून, तिथेही महाराष्ट्राच्या संस्कृतीचा आस्वाद घेण्याची संधी देशवासियांना मिळणार आहे.

## वैद्यकीय महाविद्यालयाच्या कारभाराविरोधात आंदोलनाचा इशारा

**सिंधुदुर्ग, प्रतिनिधी :**

सिंधुदुर्ग मेडिकल कॉलेजमध्ये रुग्णांची हेळसांड झाल्याने माजी आमदार वैभव नाईक यांनी मेडिकल कॉलेजचे डीन डॉ. अनंत दवंगे यांना जाब विचारत रुग्णालयाच्या कामकाजात सुधारणा झाली नाही तर तीव्र आंदोलन केले जाईल, असा इशारा त्यांनी दिला आहे.

सिंधुदुर्ग शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाने पोटात ट्यूमर असलेल्या एका महिला रुग्णाला हायरिस्क गर्भवती असल्याचा चुकीचा अहवाल देऊन तिला गोवा-बांबोळी रुग्णालयात हलविले.

तसेच कर्करोग असलेल्या एका रुग्णाला तज्ज्ञ डॉक्टर उपलब्ध नसल्याचे कारण देत



छत्रपती संभाजीनगरला पाठविण्यात आले. त्यामुळे रुग्णांची हेळसांड झाली.

यावरून शिवसेनेचे माजी आमदार वैभव नाईक यांनी संतप्त होत सिंधुदुर्ग शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे डीन डॉ. अनंत दवंगे यांची शनिवारी भेट घेऊन झाल्या प्रकाराबाबत जाब विचारला.

यावेळी कसाल जि. प. ठाकरे सेना विभागप्रमुख रवीबुवा कदम उपस्थित होते.

## आनंदवार्ता!; आता नाशिक, जळगावहून थेट दार्जिलिंग आणि महाबोधी मंदिराचा प्रवास सोपा

**नाशिक, प्रतिनिधी :** पूर्व भारताशी (उत्तर बंगाल) नाशिक, उत्तर महाराष्ट्राला जोडणारी नवीन अलिपूरद्वार-मुंबई (पनवेल) अमृत भारत एक्स्प्रेस सुरू झाली आहे. पूर्व भारत आणि पश्चिम किनारपट्टी यांच्यात ती महत्वाचा दुवा ठरेल. हा मार्ग अनेक प्रसिद्ध पर्यटनस्थळांना जोडणारा असून त्याचा महाराष्ट्रातील नाशिक, जळगावसह ठाणे आणि रायगड जिल्ह्यांला फायदा होणार आहे.भारत-भूतान आंतरराष्ट्रीय सीमेजवळ असलेल्या अलिपूरद्वार येथून सुरू होणारी ही सेवा अनेक कारणांनी महत्वाची ठरेल.




एका संवेदनशील सीमावर्ती भागातील वाहतूक सुलभ करून आणि अनेक राज्यांमध्ये पूर्व-पश्चिम राष्ट्रीय कनेक्टिव्हिटी मजबूत करणार असल्याचे रेल्वे मंत्रालयाने म्हटले आहे. ही अमृत भारत एक्सप्रेस साप्ताहिक सेवा म्हणून धावेल. अलिपूरद्वार-मुंबई (पनवेल) अमृत भारत एक्सप्रेस अलिपूरद्वार येथून गुरुवारी सकाळी ४:४५ वाजता सुटेल आणि पनवेल येथे शनिवारी सायंकाळी ५:३० वाजता पोहोचेल. पनवेल-अलिपूरद्वार अमृत भारत एक्सप्रेस पनवेल येथून सोमवारी सकाळी ११:५० वाजता सुटेल आणि बुधवारी दुपारी १:५० वाजता अलिपूरद्वार येथे पोहोचेल. महाराष्ट्रात ती कल्याण, नाशिकरोड, जळगाव व भुसावळ या ठिकाणी थांबणार आहे.हा मार्ग अनेक प्रसिद्ध पर्यटन स्थळांनाही जोडतो. यामध्ये चहाच्या मळ्यांसाठी आणि हिमालयीन दृश्यांसाठी प्रसिद्ध असलेले दार्जिलिंग, एक महत्त्वाचे प्राचीन बौद्ध शिक्षण केंद्र असलेले विक्रमशिला महाविहार, बिहार सर्किटवर जवळच असलेले महाबोधी मंदिर, भारतातील सर्वात पवित्र तीर्थक्षेत्रांपैकी एक असलेला त्रिवेणी संगम, रामायणाशी जवळून संबंधित असलेले चित्रकूट धाम आणि भगवान शंकराच्या बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेले त्र्यंबकेश्वर मंदिर यांचा समावेश आहे.धार्मिक, सांस्कृतिक आणि वारसा स्थळांपर्यंतची जाण्याचा मार्ग प्रशस्त झाल्यामुळे पर्यटनाला चालना मिळेल, स्थानिक हस्तकला आणि आदरातिथ्य सेवांना प्रोत्साहन मिळेल आणि मार्गावरील लहान व्यवसायांना पाठिंबा मिळेल अशी अपेक्षा आहे.

## कुटुंब नाही म्हणून महिलेला संरक्षणगृहात डांबणे अयोग्य; मानवी तस्करीतून सुटका केलेल्या प्रौढ महिलेला दिलासा

**मुंबई, प्रतिनिधी :** मानवी तस्करीविरोधी कारवाईदरम्यान सुटका केलेल्या प्रौढ महिलेला केवळ कौटुंबिक आधार नाही या कारणास्तव तिच्या इच्छेविरुद्ध संरक्षणगृहात डांबून ठेवता येणार नाही. अशा प्रकारची कोठडी तिच्या वैयक्तिक स्वातंत्र्याच्या आणि मुक्त संचाराच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन आहे, असा निर्वाळा उच्च न्यायालयाने महिलेला दिलासा देताना दिला.

न्यायमूर्ती निजामुद्दीन जमादार यांच्या एकलपीठाने महिलेची सुटकेची मागणी मंजूर करताना उपरोक्त निर्वाळा दिला. या महिलेची येवला पोलिसांनी हॉटेल विजय लॉजिंगवर टाकलेल्या छाप्यादरम्यान सुटका केली होती आणि नंतर कनिष्ठ न्यायालयांनी अनैतिक व्यापार (प्रतिबंध) कायद्यांतर्गत (पीटा) दिलेल्या आदेशानुसार तिला ताब्यात ठेवण्यात आले होते.

पोलिसांनी छाप्यादरम्यान दोनजणांना



अटक केली होती आणि याचिकाकर्तीसह चार महिलांची सुटका केली होती. याचिकाकर्तीवर कोणताही गुन्हा दाखल नसला तरी, दंडाधिकाऱ्यांनी १९ एप्रिल २०२५ रोजी तिला येवला येथील महिलांच्या वसतिगृहात एक वर्षासाठी ठेवण्याचे आदेश दिले होते. तिची काळजी घेण्यासाठी कोणीही नातेवाईक नाहीत आणि तिच्याकडे उत्पन्नाचे कोणते साधनही नाही, असे निरीक्षण दंडाधिकाऱ्यांनी नोंदवले होते. तिची वैयक्तिक जामिनावर सुटका केल्यास ती पुन्हा अनैतिक कृत्यांमध्ये सामील होण्याची दाट शक्यता आहे, अशी भीतीही दंडाधिकाऱ्यांनी तिला वसतिगृहात ठेवण्याचे आदेश देताना व्यक्त केली होती.या निर्णयाविरोधातील याचिकाकर्तीच्या अपिलाला सरकारी पक्षाने उच्च न्यायालयात विरोध केला, याचिकाकर्तीच्या सुरक्षेची हमी देण्यासाठी कोणीही नातेवाईक नाहीत आणि तिच्या पालकांच्या घटस्फोटानंतर ती एकटीच राहत होती, यावर जोर दिला. कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर, इतर दोन पीडितांची त्यांच्या पालकांनी जबाबदारी घेतल्याने दंडाधिकाऱ्यांनी त्यांना सोडण्याचे आदेश दिले होते. याउलट, याचिकाकर्तीची स्थिती होती. तिची जबाबदारी घेण्यासाठी कोणीही नव्हते, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले.

त्याचप्रमाणे, पीटा कायदा हा लैंगिक शोषणाला बळी पडलेल्या महिलांना शिक्षा देण्यासाठी नाही. तसेच, याचिकाकर्ती पुन्हा अनैतिक कृत्यांमध्ये सामील होऊ शकते या निराधार दाव्याच्या आधारे तिच्यावर अवाजवी निर्बंध लादले जाऊ शकत नाहीत. किंबहुना, याचिकाकर्ती ही एकटी होती ही वस्तुस्थिती तिला संरक्षण गृहात डांबून ठेवण्यासाठी पुरेसे न्याय्य कारण असू शकत नाही, असेही न्यायालयाने कनिष्ठ न्यायालयंचे आदेश रद्द करताना प्रामुख्याने स्पष्ट केले. त्याचवेळी, याचिकाकर्तीच्या तात्काळ सुटकेचे आदेश दिले. अनावश्यक अटकेद्वारे सज्ञान पीडित महिलांच्या मुक्त संचाराच्या मूलभूत हक्कावर गदा आणली जाऊ शकत नाही हेही न्यायालयाने नमूद केले.

**आपण पीडित आहोत, गुन्हेगार नाही**

येवला येथील सत्र न्यायालयाने २४ जून २०२५ रोजी हा आदेश कायम ठेवला, सुटका केलेल्या पीडित महिलांचे व्यावसायिक कारणासाठी शोषण करण्यात आले होते आणि त्यांची जीवनस्थिती पाहता त्यांना वसतिगृहात ठेवणे योग्य आहे, असे सत्र न्यायालयाने आदेशात नमूद केले होते. दंडाधिकारी आणि सत्र न्यायालयाच्या निर्णयांना याचिकाकर्तीने उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. तसेच, ती शोषणाची बळी आहे, गुन्हेगार नाही.

## फळे, भाजीपाला निर्यातीकरिता बापगांव येथे मल्टी मॉडेल हब उभारणार

**मुंबई, प्रतिनिधी :** भाजीपाला निर्यातीकरिता शेतकऱ्यांसाठी ठाणे जिल्ह्यातील मौजे बापगांव (ता. भिंवडी) येथे सर्वोपयोगी – मल्टी मॉडेल हब व टर्मिनल मार्केटची उभारणी करण्यात येणार आहे. त्यासाठी राज्य कृषि पणन महामंडळाला ७ हेक्टर ९६.८० आर जमीन उपलब्ध करून देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

या जागेवर जागतिक बँक व महाराष्ट्र शासन यांचा संयुक्त उपक्रम असलेल्या बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) या प्रकल्पाच्या माध्यमातून हब, टर्मिनल उभारण्यात येणार आहे. ज्यासाठी ९८ कोटी ६६ लाख रुपयांचा निधी मंजूर केला गेला आहे. ही जमीन राज्य कृषी पणन महामंडळाला वर्ग – २ धारणाधिकारांने विनामूल्य दिली जाणार असून, या ठिकाणी व्हेपर हिट ट्रीटमेंट, प्लँट विकीरण, पॅक हाऊस सुविधा तसेच फळे- भाजीपाला साठवणुकीकरिता सुविधांची उभारणी केली जाणार आहे. याठिकाणी आंबा, मसाले, पशुखाद्य यांच्यावर विकीरण प्रक्रियेद्वारी निर्जलीकरण करण्यात येणार आहे.

या प्रकल्पामुळे दरवर्षी एक लाख टन शेतमालाची हाताळणी करणे शक्य होणार आहे. ठाणे जिल्ह्यासह, राज्यभरातील शेतकऱ्यांसाठी एक मोठी सुविधा निर्माण होणार आहे. यातून शेतमाल निर्यातीस प्रोत्साहन मिळणार आहे. शेतमालाची गुणवत्ता सुधारणे, प्रक्रिया करणेची सुलभ होणार आहे. याठिकाणी व्यापारी व निर्यातदार यांना एकाच छताखाली आणले जाणार आहे. यातून निर्यात आणि लॉजिस्टिक (logistics) सेवांसाठी आवश्यक असलेल्या सुविधा उपलब्ध होणार आहेत. निर्यातवाढीमुळे परकीय चलन मिळणार आहे. जगभरातील बाजारपेठा व प्रकल्पांचा अभ्यास करुन एकात्मिक असा प्रकल्प उभारणेत येणार असल्यामुळे शेतमालाचे काढणीपश्चात नुकसान कमी होण्यास व मालाचा दर्जा सुधारण्यास मदत होणार आहे.

## संपादकीय

### मुंबईकरांची समस्या - फक्त आश्वासनं , निवारण नाहीच...

सत्तेच्या हव्यासापोटी मुंबईकरांच्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष होणं ही आजची कटू वस्तुस्थिती आहे. तब्बल नऊ वर्षांनंतर झालेल्या महापालिका निवडणुकांनंतर नव्या सत्तेकडून आता मुंबईकरांना केवळ राजकारण नव्हे, तर ठोस उपायांची अपेक्षा आहे.

मुंबई महानगरपालिकेत गेल्या तीन दशकांहून अधिक काळ ठाकरेंच्या सेनेची सत्ता होती. तीन दशकाच्या काळात ठाकरे सेनेबरोबर भाजपही सत्तेमध्ये वाटेकरी होता. राजकारणातील दोन मित्रपक्ष, बदलले सत्तेचे समीकरण यामुळे आज राजकीय शत्रू झाले आहेत. त्यामुळे लोकसभा, विधानसभा निवडणुकीत भाजप विरुद्ध ठाकरे सेना सामना रंगला होता. तर त्यानंतर १५ डिसेंबर २०२५ रोजी मुंबई महापालिकेसह राज्यातील २९ महानगरपालिकेच्या निवडणुकीचे बिगुल वाजले. तब्बल ९ वर्षांनंतर मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुका पार पडल्या. निवडणुकीत जय- पराजय हे ठरलेले असतात. मात्र मतदान करणाऱ्या मुंबईकरांचे काय, त्यांच्या समस्यांचे काय, मुलभूत सुविधा मिळणार का, याच माफक अपेक्षा मुंबईकरांच्या असतात. त्यामुळे मुंबईत सत्तासमीकरण बदलले असले तरी समस्या आजही कायम आहेत. लोकशाहीच्या उत्साहात मतदाराचा एक दिवस असतो आणि पाच वर्षे ही राजकीय पक्षाची असतात. त्यामुळे सत्तेसाठी राजकारण करणे हा राजकीय पक्षांचा अजेंडा असला तरी मुंबईकरांच्या समस्यांचे निवारण करणे हीदेखील लोकप्रतिनिधींची जबाबदारी आहे.

आपल्या प्रभागातील समस्यांचे निवारण होईल या आशेने मतदार राजा मोठ्या विश्वासाने लोकप्रतिनिधींची निवड करत मुंबई महापालिकेत पाठवतो. विजयाची माळ गळ्यात पडली की, काही दिवस लोकप्रतिनिधी मतदार राजाचे गुणगान गातो. मात्र जसे दिवस पुढे सरकतात तसा लोकप्रतिनिधींना मतदार राजाचा विसर पडल्याचे दिसून येते. सुरळीत पाणीपुरवठा, खड्डे मुक्त रस्ते, अतिधोकादायक इमारतींतील रहिवाशांचे पुनर्वसन, आगीच्या घटनांपासून मुंबईकरांचे संरक्षण, कचरा मुक्त मुंबई या सुविधा उपलब्ध करणे राज्यकर्त्यांची जबाबदारी असते. सत्ता येते, जाते, पण नेते मंडळी 'अर्थपूर्ण' राजकारणातचं व्यस्त असतात. खड्ड्यांमुळे रस्त्यांची चाळण, अतिधोकादायक इमारतींतील रहिवाशांचा जीव टांगणीला, आरोग्य व्यवस्थेचा बोजवारा, २४ तास पाणी योजना कागदावर या समस्यांचा सामना नेहमीच मुंबईकरांना करावा लागतो. त्यामुळे सत्तेत कोणी विराजमान झाले, तरी मुंबईकरांच्या समस्या कायमच राहतात. परंतु २०२६ मध्ये मुंबई महानगरपालिकेत नव्या पर्वाचा उदय झाला आहे. मुंबई महापालिकेच्या निवडणुकीच्या निकालानंतर पालिकेतील सत्ताधारी असो वा विरोधक मुंबईकरांना मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी तत्परता दाखवतील, असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

२४ तास पाणी, दर्जेदार आरोग्य सेवा, खड्डेमुक्त रस्ते, पालिका शाळांतील विद्यार्थ्यांची गळती थांबवत शिक्षणाचा दर्जा वाढवणे या गोष्टींची अंमलबजावणी करणे मुंबई महापालिका प्रशासनाची जबाबदारीच आहे. तर पालिका प्रशासनाच्या कामकाजावर लक्ष ठेवत त्या सुविधा करदात्या मुंबईकरांना मिळतात का हे पहाणे सत्ताधारी व विरोधी पक्षनेत्यांचे कर्तव्य. मात्र मुंबईकर असुविधांच्या बोजाखाली दबला जात असून नेतेमंडळी अर्थपूर्ण राजकारण करत मुंबई महापालिकेतील सत्ता काबीज करण्यात धन्यता मानतात. एकूणच सत्तेत कोणी विराजमान झाले तरी मुंबईकरांच्या समस्या कायमचं राहणार आहेत, यात दुमत नाही.

मुंबई महापालिका आशिया खंडातील सर्वात श्रीमंत महापालिका म्हणून जगभरात ओळखली जाते. त्यामुळे मुंबई महापालिकेतील सत्तेचा उपभोग घेण्यास कुठलाही राजकीय पक्ष नकार देईल असा विचार ही मनात येणे शक्य नाही. मुंबई महापालिकेचा डोलारा उभा आहे, तो करदात्या मुंबईकरांच्या कर रुपातून मिळणाऱ्या पैशामुळे. करदात्या मुंबईकरांना सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी प्रशासनाच्या मदतीला लोकप्रतिनिधी असतातच. मात्र गेल्या काही वर्षांपासून मुंबई महापालिकेत अर्थपूर्ण राजकारणाला पसंती दिली जात आहे. त्यामुळे एखाद्या कामाची घोषणा करायची, काम अंतिम टप्प्यात येईपर्यंत खर्चात वाढ करायची, असा कारभार सुरू आहे. मुंबईकरांना मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देणे ही जबाबदारी लोकप्रतिनिधी व पालिका प्रशासनाची असते. मात्र सध्या सुरू असलेल्या अर्थपूर्ण राजकारणात कचरा मुक्त मुंबई, खड्डे मुक्त रस्ते हे अडकलेत हे वास्तव आहे.

# ...काळजाचा ठोका चुकवणारी शहादत!

## जिल्हा परीषद अधिकारी कर्मचारी क्रीडा स्पर्धेचे थाटात उद्घाटन!

महाराष्ट्र जीत

**वाशिम(प्रविण पट्टेबहादुर) :** काही क्षण असे असतात, जे टाळयांच्या आवाजातही रडवतात आणि काही कथा अशा असतात, ज्या सांगताना शब्द आणि श्वासही थरथरतात.

वाशिम जिल्हा परिषदेकडून आयोजित अधिकारी-कर्मचारी क्रीडा स्पर्धा आणि सांस्कृतिक महोत्सवाचा काल पहिला दिवस. जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या हस्ते स्पर्धांचा शुभारंभ झाला आणि लगेच विविध संघांच्या झाक्यांची मिरवणूक सुरू झाली. प्रत्येक झाकी आपापल्या विषयात रंगतदार... पण एक झाकी अशी होती, जिने अख्ख्या मैदानाचं हसू एका क्षणात गिळून टाकलं.

गटविकास अधिकारी रवींद्र सोनोने यांच्या नेतृत्वात पंचायत समिती वाशिमच्या खेळाडूंनी सादर केलेली झाकी... शहीद जवान अमोल गोरे यांच्या बलिदानाची गाथा.यात सहभागी असलेल्या सर्व कलावंत कर्मचाऱ्यांनी अत्यंत जीव ओतून अभिनय सादर केला होता. झाकीच्या माध्यमातून दृश्य उभे राहते.सुट्टीवर गावी आलेला जवान. आई-वडिलांचा आधार आणि पत्नीच्या डोळ्यातला अभिमान. दोन चिमुकल्या निरागस मुलांचा बाप.






त्यांचा काही दिवसांचा छोटा संसार... साधा, शांत, पण सोन्यासारखा. आणि मग अचानक कर्तव्याची हाक. कुटुंबाचा निरोप घेऊन... आपल्या आई-वडिलांच्या आठवणी, दोन गोड चिमुकल्या मुलांचे गोंडस हसू आणि पत्नीचा आतुरलेला चेहरा डोळ्यात साठवून जवान कर्तव्यावर निघून जातो. दृश्य बदलतं.टीव्ही स्क्रीनवर बातमी झळकते...“देशाच्या सीमेवर झालेल्या चकमकीत वाशिमचा सुपुत्र अमोल गोरे शहीद.”क्षणात सगळे स्तब्ध होतात. तिरंग्यात गुंडाळलेली शवपेटी.

**आई-वडिलांचा आक्रोश.**

पत्नीचा धाय मोकलून फुटलेला जीव.शव पेटीतील बाबांना बघून “आई बाबा का उठत नाहीत” अशी मुलांनी मारलेली आर्त हाक सगळ्यांच्याच काळजाला चिरून जाते.उपस्थितांच्या डोळ्यांच्या कडा ओलावतात. बंदुकीच्या फैरीत शहीद अमोल गोरे यांना अखेरची सलामी दिली जाते...

झाकी संपते, मैदान टाळ्यांनी दुमदुमतं.पन तेवढ्यात अँकरचा आवाज काळजाचा ठोका चुकवतो.“आज ज्या शहीद अमोल गोरे यांच्या शौर्याला आदरांजली वाहण्यात आली, त्यांच्या पत्नी आणि दोन लहान मुलं इथे, या स्टेजवर उपस्थित आहेत.” त्या क्षणी टाळ्या थांबतात, श्वास अडकतो,डोळे भरून येतात.ज्या वेदनेचा अभिनय पाहिला, ती वेदना प्रत्यक्ष समोर उभी असते.ती पत्नी, जिचं आयुष्य एका बातमीने बदललं. ती मुलं, ज्यांचं बालपण कायमचं पोरकं झालं.कार्यक्रमात उपस्थित जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांच्या हस्ते शहीद गोरे यांच्या पत्नी वैशाली अमोल गोरे दोन चिमुकले मुलं (अंदाजे पाच आणि सात वर्ष वयाची) यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. सत्कार स्वीकारताना वैशाली ताईंचा हुंदका आतच दाटला होता. कार्यक्रम संपला पण आठवणी काही संपत नाहीत. शहीद अमोल गोरे आज फक्त एका झाकीत नव्हते.ते प्रत्येक ओलावलेल्या डोळ्यात होते.प्रत्येक थरथरणाऱ्या टाळीत होते.ते प्रत्येकाच्या मनात एकच विचार सोडून गेले,”देशासाठी शहीद होणं वीरतेचं शिखर आहे पण त्या वीराच्या कुटुंबासोबत उभं राहणं, ही खरी देशभक्ती आहे.वाशिम पंचायत समितीचे गटविकास अधिकारी रवींद्र सोनवणे, गटशिक्षणाधिकारी गजानन बाजड, प्रशासन अधिकारी स्वाती वानखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली वाशिम जिल्ह्यातील हरहुण्णरी व्यक्तिमत्व, युवा अभिनेता किशोर कांबळे यांच्या दिग्दर्शनात सादर करण्यात आलेल्या या झाकी मध्ये वाशिम पंचायत समिती मधील शिक्षक, शिक्षिका ग्रामसेवक, आरोग्य अधिकारी, कर्मचारी, पंचायत समिती कार्यालयातील कर्मचारी यांनी विविध बहुरंगी भूमिका केल्या.

## इंधन बचतीचा संकल्प:खेड आगारात इंधन बचत मासिक कार्यक्रमाचे आयोजन

महाराष्ट्र जीत

**खेड(प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर) :** इंधन बचत कशी करावी, इंधन बचतीचे महत्त्व काय याकरिता राज्य परिवहन महामंडळाच्या खेड आगारात इंधन बचत मासिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दिपप्रज्वलनाने झाले.हा इंधन बचत मासिक कार्यक्रम दि.१६/०१/२०२६ते दि.१५/०२/२०२६या कालावधीमध्ये राबविण्यात येणार आहे.सदर मोहिमेच्या अनुषंगाने इंधन बचत मासिक कार्यक्रमाच्या अनुषंगाने राज्य परिवहन खेड आगारात हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.कार्यक्रमाचे अध्यक्ष



श्री.रणजित राजेशिर्के आगार व्यवस्थापक खेड, तसेच प्रमुख पाहुणे तथा मार्गदर्शक म्हणून भूगोल विषयाचे तज्ञ श्री.राज भिंगारे सर, ज्ञानदीप शाळा भडगाव, खेड यांनी इंधन बचतीबाबत मोलाचे मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाला जनजागृती सेवा संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांची उपस्थिती लाभली. पर्यावरण संवर्धन, पारंपरिक ऊर्जा स्त्रोतांचा काटकसरीने वापर आगाराचा खर्च कमी करण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम राबविण्यात येतो.इंधन बचतीसंदर्भात जनजागृती निर्माण करण्याच्या दृष्टीने हा कार्यक्रम उपयुक्त ठरल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

## प्रजासत्ताक दिनानिमित्त कवी संमेलन

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी प्रांजली काळबेंडे :** अव्यक्त अबोली बहुउद्देशीय संस्था पुलगाव आयोजीत नववे राज्यस्तरीय साहित्य संमेलन येत्या 26 जानेवारी 2026 रोजी प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने सिद्धार्थ नवयुवक वाचनालय पुलगाव तालुका देवळी जिल्हा वर्धा येथे करण्याचे निश्चित झाले आहे.

या साहित्य संमेलनात प्रगट मुलाखत, परिसंवाद, एकांकिका सादरीकरण तसेच निमंत्रितांचे कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

अव्यक्त अबोली बहुउद्देशीय संस्थेमार्फत मागील सात वर्षे झाले विविध उपक्रमाच्या माध्यमातून आणि साहित्य संमेलनाच्या माध्यमातून सामाजिक मार्गदर्शनपर व्याख्यान परिसंवाद आणि चर्चासत्राचे आयोजन करण्यात येते.

या संमेलनासाठी अध्यक्ष म्हणून सन्माननीय कवी पद्माकर अंबादे यांची एक मतांनी निवड करण्यात आली आहे.

तर परिसंवादसाठी सन्माननीय भूषण रामटेके सर यांचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली आहे.




त्याचबरोबर मुलाखत या सत्रामध्ये सन्माननीय दिलीप थूल सर यांची मुलाखत घेतली जाणार आहे.

या संमेलनामध्ये वर्धा नागपूर अमरावती चंद्रपूर सह विविध जिल्ह्यातून कवी आणि मान्यवर आपली उपस्थिती लावणार आहेत तरी या कार्यक्रमाचा आपणही आस्वाद घ्यावा अशी विनंती आयोजक जयश्री चव्हाण अध्यक्षा अव्यक्त अबोली बहुउद्देशीय संस्था पुलगाव यांच्यामार्फत करण्यात आली आहे.

## जिल्हा परिषद शाळेची इयत्ता सहावीची विद्यार्थिनीची गगन भरारी (विमान वारी)

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी भारत चव्हाण/सारकिन्ही :** झोडगा येथील जिल्हा परिषद शाळा तालुका बार्शीटाकळी जिल्हा अकोला. येथील इयत्ता सहावी मधील विद्यार्थिनी कु दिया डावरे हिची भारतीय अवकाश संशोधन संस्था ( इस्रो )येथे होणाऱ्या विशेष शैक्षणिक विमान वारी साठी निवड झाली असल्यामुळे ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळेचे विद्यार्थिनी सत्कार सुषमा संतोष राठोड जिल्हा सचिव राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित दादा गट) संचालिका जय सेवालाल गौरक्षण संस्थान जनुना व संतोष राठोड संचालक स्टेट ट्रान्सपोर्ट को-ऑपरेटिव बँक लिमिटेड महाराष्ट्र राज्य मुंबई



तथा संस्थापक अध्यक्ष जय सेवालाल गौरक्षण संस्थान जनुना आदि मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत आई-वडिलांसह सहकुटुंब सहपरिवारांचे शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. सत्कार प्रसंगी कुमारी दिया डावरे हिचा आदर्श ग्रामीण जनतेतील विद्यार्थिनी विद्यार्थ्यांनी घ्यावा आपल्या परिवाराचे गावाचे जिल्ह्याचे नाव लौकिक करून मानाचा तुरा शिरपेचात रोवला त्याच पद्धतीने विद्यार्थ्यांनी जिद्द चिकाटी मेहनत करणे अत्यंत गरजेचे आहे कारण विज्ञान युग आहे या युगात स्पर्धेतून टिकला तो टिकला वाचाल तर वाचाल या म्हणीप्रमाणे आपली जिद्द आणि चिकाटी ठेवावी, ज्या ज्या वेळेस शैक्षणिक क्षेत्रात कोणत्याही अडीअडचणीच्या वेळेस आम्हाला आठवण करा आम्ही निश्चित असताना मन धनाने मदत करू असे आश्वासन दिले.

# सुशिक्षित बेरोजगारांच्या प्रश्नावर उदासीनता; उमरखेड-महागांव विधानसभेचा तरुण वर्ग हताश

## विकासाच्या घोषणा हवेतच, रोजगाराचा प्रश्न मात्र अनुत्तरित

महाराष्ट्र जीत

**लखन लोंढे/महागांव :** महागांव-उमरखेड विधानसभा मतदारसंघात गेल्या काही वर्षांत सुशिक्षित बेरोजगारांची संख्या झपाट्याने वाढत असताना, या गंभीर प्रश्नाकडे लोकप्रतिनिधींकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचा आरोप आता उघडपणे होत आहे. पदवीधर, अभियंते, आयटीआय, डिप्लोमा, तसेच स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे शेकडो युवक-युवती आजही रोजगाराच्या प्रतीक्षेत आहेत.


शिक्षणासाठी कर्ज काढले, वर्षानुवर्षे अभ्यास केला, परंतु नोकरी मिळत नसल्याने अनेक तरुण मानसिक तणावात सापडले आहेत. स्थानिक पातळीवर उद्योग, प्रशिक्षण केंद्रे, रोजगार मेळावे किंवा स्वयंरोजगारासाठी ठोस धोरण राबवले जात नसल्याने तरुण वर्गात तीव्र असंतोष आहे.

**आश्वासनांची पुनरावृत्ती, अंमलबजावणी शून्य**

निवडणुकीपूर्वी विकास, उद्योग आणि रोजगारनिर्मितीच्या मोठमोठ्या घोषणा करण्यात आल्या. मात्र निवडणुका पार पडल्यानंतर या घोषणांचा मागमूसही उरलेला नाही. रोजगाराचा प्रश्न उपस्थित केला असता, केवळ भविष्यातील योजना आणि कागदी प्रस्तावांचीच चर्चा होत असल्याची प्रतिक्रिया सुशिक्षित बेरोजगार व्यक्त करीत आहेत.

**स्थलांतराची वेळ, गांव ओस पडण्याची भीती**

रोजगार नसल्याने अनेक तरुणांना पुणे, मुंबई, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, हैदराबाद अशा शहरांकडे स्थलांतर




करावे लागत आहे. परिणामी ग्रामीण भागातील युवकशक्ती बाहेर पडत असून गावागावातील आर्थिक व सामाजिक घडी विस्कळीत होत चालली आहे. काही तरुण कमी वेतनावर अस्थिर कामे स्वीकारण्यास मजबूर झाले आहेत.

**प्रश्न सुशिक्षित बेरोजगारांचा की प्रतिनिधींच्या कार्यक्षमतेचा?**

सुशिक्षित बेरोजगारांचा प्रश्न केवळ वैयक्तिक अडचणीपुरता मर्यादित राहिलेला नसून, तो प्रशासन व लोकप्रतिनिधींच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारा ठरत आहे. रोजगार निर्मितीसाठी ठोस धोरण, पारदर्शक अंमलबजावणी आणि स्थानिक युवकांना प्राधान्य देणाऱ्या योजना राबविल्या जात नसतील, तर असंतोष अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

**तरुणांचा थेट सवाल**

“आम्ही फक्त मतदार आहोत की विकासाचे भागीदार?” असा थेट सवाल आज उमरखेड-महागांवचा तरुण वर्ग विचारत आहे. येत्या काळात या प्रश्नावर लोकप्रतिनिधी काय भूमिका घेतात, ठोस निर्णय घेतात की पुन्हा एकदा मौन बाळगतात, याकडे संपूर्ण उमरखेड-महागांव मतदारसंघाचे लक्ष लागले आहे.

महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी महामाया प्रिंटिंग प्रेस श्रीराम अपार्टमेंट गणेदिवाल लेआउट भाग्य नगर, अमरावती,महाराष्ट्र-४४४६०२ येथे मुद्रीत करुन दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय घर क्रमांक ८९, प्रियदर्शनी कॉलनी, बायपास प्रभाग क्रमांक ८ कारंजा, वाशिम, महाराष्ट्र - ४४४१०५. येथे प्रकाशित केले. मो.९९२१०४५१२१ / ९६०४४३०००२ (सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत) (याआवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहिल)

# उकळीपेन येथील जवानांचा सत्कार समारंभ कार्यक्रम संपन्न



महाराष्ट्र जीत

**वाशिम(प्रतिनिधी) :** उकळीपेन येथे शिवसेनेच्या वतीने C I S F &C R P F जवानांचा सत्कार करण्यात आला.नंदकिशोर प्रल्हाद गांजरे याचि CISF पदी नियुक्ती झाली,तर महेश कैलास कुंटे याचि CRPF पदी नियुक्ती झाली.नंदकिशोर यांची परीस्थिती हालाखीची असुनही त्या गोष्टीला बगल देत त्यांनी अथक परिश्रमाने या वर मात केली. महेश सुध्दा जेमतेम परीस्थितीतीलच विद्यार्थी आहे पण त्यांनी सुध्दा खूप मेहनत केली व गावाचे रोशन केले नविन युवा पिढीला यांचा आदर्श घ्यायला हवा या प्रसंगी शिवसेनेचे उपतालुकाप्रमुख गजानन जैताडे पाटील ,प्रफुल देवळे, दत्तराव गांजरे,बबन ठाकरे, विठ्ठल चौधरी, संजय भोयनवाड,माधवराव लांडे, मोतीरामजी कुटे,राजुभाऊ कुटे, गोवर्धन भगत, प्रविण मधुरवाड,सागर गांजरे, बाबा पहेलवान, सिताराम भगत, नारायण महाले,मयुर भोयर, सुरेश भगत,शालीक खडसे, गजानन गांजरे,दलीत दिपके,बबन जैताडे , गणेश जैताडे, दत्तराव अंभोरे,रामु कुटे,रवि चव्हाण आणि गावकरी मंडळी उपस्थित होती.यावेळी या दोन्ही जवांनाना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# वाघाये महाविद्यालयाच्या 'राष्ट्रीय सेवा योजना' शिबिराचे मोरगाव येथे उत्साहात उद्‌घाटन

## 'युथ फॉर डिजिटल लिटरसी'चा जागर

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी /भंडारा लाखनी** :वाघाये महाविद्यालयाच्या वतीने 'युथ फॉर डिजिटल लिटरसी' (डिजिटल साक्षरतेसाठी युवा) या संकल्पनेवर आधारित राष्ट्रीय सेवा योजनेचे (रासेयो) सात दिवसीय विशेष निवासी शिबिर मोरगाव/राजे येथे आयोजित करण्यात आले आहे. १५ जानेवारी ते २१ जानेवारी २०२६ या कालावधीत चालणाऱ्या या शिबिराचे भव्य उद्घाटन नुकतेच मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले.



या उद्घाटन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. गणेश एम. कापसे होते. शिबिराचे उद्घाटन मोरगावच्या सरपंच गायत्रीताई वाघ यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी उपसरपंच मनोहर पटले, माजी सरपंच नाजूक भैसारे, ग्रामपंचायत सदस्य ओमप्रकाश भैसारे, पूनम पारधीकर, रजनी वालकर, पोलीस पाटील सुरेश राऊत, ग्रामपंचायत अधिकारी राजेभाऊ ढवळे, ग्रामपंचायत सदस्य जितेंद्र धारणे, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. पुण्यशील एस. टेंभुर्णे, प्रा. डॉ. चंद्रशेखर देवघरे आणि प्रा. डॉ. मंगेश वंजारी प्रामुख्याने उपस्थित होते.

उद्घाटक गायत्रीताई वाघ यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "राष्ट्रीय सेवा योजना शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक, सामाजिक, बौद्धिक आणि नैतिक असा सर्वांगीण विकास होतो. अशा शिबिरांमुळे विद्यार्थ्यांमध्ये समाजसेवेची ओढ निर्माण होते." उपसरपंच मनोहर पटले यांनीही आपले विचार मांडताना सांगितले की, शिबिरामुळे विद्यार्थ्यांना चांगली शिस्त लागते आणि त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव मिळतो.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. गणेश कापसे यांनी स्पष्ट केले की, विद्यार्थ्यांना सामाजिक जाणीव व्हावी आणि त्यांना चांगल्या सवयी लागाव्या, या उद्देशाने महाविद्यालय दरवर्षी अशा विशेष शिबिरांचे आयोजन करते. या शिबिरातून विद्यार्थी उद्याचे जबाबदार नागरिक म्हणून घडतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्रा. सागर वारंगणे, प्रा. तुषार डोंगरवार, विद्यार्थी प्रतिनिधी व माजी विद्यार्थी चेतन वाघमारे, पुरुषोत्तम हटवार यांच्यासह सर्व स्वयंसेवक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. पुण्यशील एस. टेंभुर्णे यांनी केले, तर उत्कृष्ट संचालन प्रा. श्रद्धा बोरकर यांनी केले. उपस्थितांचे आभार डॉ. रूपचंद डोंगरवार यांनी मानले. मोरगाव परिसरातील प्रतिष्ठित नागरिक आणि ग्रामस्थांच्या सहकार्याने हा उद्घाटन सोहळा यशस्वीरित्या पार पडला.

# भारतीय जनता पक्षाच्या विजयाचा कारंजात जल्लोष

## फटाक्यांची आतषबाजी व पेढ्यांचे वाटप

महाराष्ट्र जीत

**कारंजा :** महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने राज्यात घवघवीत यश संपादन केले आहे. या दणदणीत विजयामुळे शहरात भाजप कार्यकर्ते व समर्थकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून त्याचा १६ जानेवारी रोजी आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे व आमदार सईताई डहाके यांच्या मार्गदर्शनात भाजपा शहर व तालुका शाखेच्या वतीने हा विजय उत्सव साजरा करण्यात आला. त्यानिमित्त स्थानित छत्रपती शिवाजी

महाराज चौकात भाजप कार्यकर्त्यांनी एकत्र येत फटाके फोडले व एकमेकांना शुभेच्छा



दिल्या. तसेच जल्लोषात विजय साजरा केला. तत्पूर्वी, शिवरायांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी भारतीय जनता पार्टीचा विजय असो, वंदे मातरम, भारत माता की जय अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. येथून भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते आमदार सईताई डहाके यांच्या निवासस्थानी पोहोचले.

येथे सर्वांना पेढ्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी आ. डहाके यांच्यासह भाजपचे जिल्हा सरचिटणीस डॉ. राजीव काळे, भाजपचे तालुकाध्यक्ष संजय लाहे, प्रभारी शहराध्यक्ष अमित संगेतार ज्येष्ठ पदाधिकारी

निरंजन करडे, कौस्तुभ डहाके, गटनेत्या शालिनीताई ठाकरे, नगरसेवक सच्चानंद थद्दाणी , नितीन गढवाले, अजय श्रीवास, सागर अंभोरे, अतुल चिमेगावे, नगरसेविका कुसुमताई अघम, चंदाताई कोळकर, कांचनताई डेंडूळे, ज्योतीताई राठोड, सविता तई काळे, माजी नगरसेवक प्रसन्न पळसकर, प्रशांत ठाकरे, विशाल दबडे, फिरोज पटेल, योगेश ठाकरे, किरण चौधरी, पवन धार्डीकर, संदीप कुहे, प्रवेश राठोड, बजरंग दल विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा उपाध्यक्ष मंगेश कडेल, पुंडलिक झोंबाडे, गोपी डेंडूळे, जिग्नेश लोडाया, समीर देशपांडे, रवींद्र राऊत, विकी कोळकर यांच्यासह इतर उपस्थित होत

# शिव-मार्तंड प्रतिष्ठान च्या गणरायाचा आगमन सोहळा संपन्न...

महाराष्ट्र जीत

**ठाणे विशेष प्रतिनिधी (नागेश पवार) -** दिवा शहरातील गणेश नगर येथील गल्ली नं.६ च्या शिव-मार्तंड प्रतिष्ठानच्या श्रीं चे काल सायंकाळी ग्लोबल स्कूल येथून वाजत गाजत भव्य मिरवणूक काढण्यात आली.

मंडळाचे हे माघी गणेश जयंती उत्सवाचे ४ थे वर्ष असले तरी देखील यांच्या मार्फत साकारले जाणारे देखावे व उत्सावादरम्यान राबवल्या जाणाऱ्या कार्यक्रमांमुळे हे मंडळ दरवर्षी चर्चेत असते.

एकीकडे या मिरवणुकीत मोठ्या संख्येने महिलांनी







सहभाग घेऊन नाचत-जल्लोष करत बाप्पाचे स्वागत केले तर दुसरीकडे वारकरी संप्रदायाच्या मंडळींकडून पारंपरिक भजन कीर्तन करत गणरायाचे स्वागत करण्यात आले.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार दिनानिमित्त सावरगाव जिरे येथे जाहीर अभिवादन सभा

- राज्यमंत्री दर्जा प्राप्त जयदीप कवाडे प्रमुख मार्गदर्शक म्हणून राहणार उपस्थित
- डॉ. रामपाल महाराज यांचे समाज प्रबोधनपर कीर्तन आयोजित







महाराष्ट्र जीत

**वाशिम(प्रविण पट्टेबहादुर) :** येथून जवळच असलेले सावरगाव जिरे येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार दिनानिमित्त जाहीर अभिवादन सभा दिनांक 21 जानेवारी 2026 रोजी सायंकाळी 6 वाजता आयोजित करण्यात आली आहे.या कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्य लघुउद्योग महामंडळ (राज्यमंत्री दर्जा) असलेले भाई जयदीप कवाडे प्रमुख मार्गदर्शक म्हणून लाभणार आहेत.या कार्यक्रमाला गोपालराव आटोटे (गुरुजी) पीरीपाचे जिल्हाध्यक्ष दौलतराव हिवराळे.जिल्हा परिषदेचे सदस्य दिलीप भाऊ देशमुख पंचायत समिती माजी सभापती गजानन भोने आधी नेतेमंडळी उपस्थित असणार आहेत. या कार्यक्रमाला सत्यपाल महाराजांचे व संदीपपाल महाराज शिष्य सप्त खंजिरी वादक समाज प्रबोधनकार डॉ. रामपाल महाराज यांचे प्रबोधन कार्यक्रम असणार आहे. तरी या कार्यक्रमाला जास्तीत जास्त लोकांनी उपस्थित राहावे.असे आवाहण राहुल पडघान सर व सावरगाव जिरे च्या वतीने करण्यात आले आहे.

# भावड मूर्ती विटंबना प्रकरण: आमदार नरेंद्र भोंडेकरांचा अड्याळमध्ये रास्ता रोको

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी / भंडारा/ अड्याळ :** पवनी विधानसभा क्षेत्रातील भावड गावात १७ तारखेला भगवान शंकराची मूर्ती विखंडित केल्याच्या घटनेने संपूर्ण जिल्ह्यात संतापाची लाट उसळली आहे. घटनेला 24 तास उलटूनही आरोपी अद्याप पोलिसांच्या हाताला लागलेला नाही. या प्रकरणी प्रशासनाला दिलेला २४ तासांचा अल्टिमेटम संपल्यानंतर, आमदार नरेंद्र भोंडेकर यांनी आक्रमक पवित्रा घेत आज अड्याळ पोलीस स्टेशनसमोर जोरदार निदर्शनं केली.



**२० मिनिटे रास्ता रोको, पोलीस प्रशासनाचा निषेध**

आमदार भोंडेकर यांच्या नेतृत्वाखाली आज अड्याळ पोलीस स्टेशनसमोर सुमारे २० मिनिटे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी आंदोलकांनी पोलीस प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत घोषणाबाजी केली. आरोपींना अटक करण्यात पोलीस जाणीवपूर्वक दिरंगाई करत असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला.

आंदोलनादरम्यान बोलताना आमदार नरेंद्र भोंडेकर यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक (SP) नरुल हसन यांच्यावर थेट शब्दांत हल्ला चढवला. "हिंदू लोकांबाबत ॲलर्जी आहे का?," असा खळबळजनक आरोप भोंडेकर यांनी केला. हिंदूंच्या श्रद्धास्थानांची विटंबना होत असताना पोलीस प्रशासन मूग गिळून बसले आहे, अशी टीकाही त्यांनी केली.

**३-४ दिवसांचा अल्टिमेटम; अन्यथा 'भंडारा बंद'**

आमदार भोंडेकर यांनी प्रशासनाला शेवटचा इशारा देताना सांगितले की, "जर येत्या ३ ते ४ दिवसांत मूर्ती तोडणाऱ्या आरोपीला अटक झाली नाही, तर संपूर्ण भंडारा शहर जाम करण्यात येईल. हे आंदोलन अधिक उग्र होईल आणि त्याची सर्व जबाबदारी प्रशासनाची असेल."

**अड्याळमध्ये तणावपूर्ण शांतता, पोलीस बंदोबस्तात वाढ**

या आंदोलनामुळे आणि भावड गावातील घटनेमुळे परिसरात तणावाचे वातावरण आहे. खबरदारीचा उपाय म्हणून अड्याळ पोलीस स्टेशन आणि परिसरात मोठा पोलीस फौजफाटा तैनात करण्यात आला आहे. आता पोलीस पुढील ३-४ दिवसांत आरोपीला पकडण्यात यशस्वी होतात की आमदार भोंडेकर आपल्या इशाऱ्याप्रमाणे मोठे आंदोलन छेडतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**आमदार नरेंद्र भोंडेकर यांनी तीव्र शब्दांत प्रतिक्रिया व्यक्त केली.**

ही घटना एकदा नव्हे तर तब्बल तीन वेळा घडली असून, त्यामुळे समस्त हिंदू समाजाच्या भावना गंभीरपणे दुखावल्या गेल्या आहेत. महाकालाच्या मूर्तीची विटंबना करणाऱ्या विकृत प्रवृत्तीच्या व्यक्तींना तातडीने अटक करण्यात यावी, अशी ठाम मागणी त्यांनी केली.

पोलीस प्रशासन आरोपींना अटक करण्याऐवजी केवळ समितीवर समित्या स्थापन करून संबंधितांना धमकावत असल्याचा आरोपही त्यांनी केला. पोलीस अधीक्षक नुरुल हसन यांनी सीसीटीव्ही बसवण्याचा सल्ला दिला आहे, मात्र सीसीटीव्ही बसवण्याची जबाबदारी प्रशासनाचीच आहे, असे भोंडेकर म्हणाले.

हिंदू धर्माच्या भावना दुखावल्या जात असताना, उलट संबंधितांवरच गुन्हा दाखल करण्याची भाषा केली जात असल्यास, ही लोकशाही आहे की पोलिसशाही, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. जर एखादा पोलीस अधीक्षक हिंदू धर्माच्या विरोधात काम करत असेल, तर अशा अधिकाऱ्याची भंडारा जिल्ह्यात गरज नसल्याचेही त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले.

पोलीस प्रशासनाला इशारा देताना ते म्हणाले की, वर्दीची गरमी कायमची नसते. लोकशाही पद्धतीने आम्हाला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानात दिलेले अधिकार आम्हाला माहिती आहेत. गरज पडल्यास त्या अधिकारांचा वापर करून आम्ही रस्त्यावर उतरू, असेही त्यांनी ठणकावून सांगितले.

# महाराणा प्रताप : लोककल्याणाच्या सामाजिक कार्याची अमर परंपरा

भारतीय इतिहासाच्या दीर्घ आणि समृद्ध परंपरेत काही व्यक्तिमत्त्वे अशी आहेत की ज्यांचे स्मरण केवळ त्यांच्या पराक्रमामुळे किंवा राजकीय संघर्षामुळे मर्यादित राहत नाही, तर त्यांच्या सामाजिक जाणिवा, लोककल्याणाची भूमिका आणि मूल्यनिष्ठ जीवनामुळे ती व्यक्तिमत्त्वे काळाच्या पलीकडे जाऊन समाजमनावर अधिराज्य गाजवतात. महाराणा प्रताप हे असेच एक अद्वितीय व्यक्तिमत्त्व आहे. स्मृतीदिनानिमित्त महाराणा प्रताप यांचे स्मरण करताना त्यांना केवळ हल्दीघाटीच्या रणांगणावर लढणारा पराक्रमी योद्धा म्हणून पाहणे अपुरे ठरेल. त्यांच्या जीवनाचा खरा अर्थ त्यांच्या सामाजिक कार्यात, प्रजेप्रती असलेल्या निष्ठेत, स्वाभिमानाच्या भूमिकेत आणि लोककल्याणासाठी केलेल्या त्यागात दडलेला आहे. महाराणा प्रताप यांचे संपूर्ण जीवन हे समाजकेंद्रित विचारांचे, मानवी मूल्यांचे आणि स्वातंत्र्याच्या व्यापक अर्थाचे प्रतीक होते.

सोळाव्या शतकातील भारत हा सत्तासंघर्षांचा, साम्राज्यविस्ताराचा आणि सामाजिक उलथापालथींचा काळ होता. मुघल साम्राज्याच्या विस्तारामुळे अनेक प्रादेशिक राज्यांवर परकीय सत्तेचे वर्चस्व निर्माण झाले होते. अकबराच्या काळात अनेक राजांनी मांडलिकत्व स्वीकारून आपले राज्य, वैभव आणि व्यक्तिगत सुरक्षितता जपण्याचा मार्ग निवडला. परंतु महाराणा प्रताप यांनी हा मार्ग नाकारला. त्यांनी परकीय सत्तेच्या अधीन जाणे म्हणजे केवळ राजकीय पराभव नसून सामाजिक, सांस्कृतिक आणि नैतिक अधःपतन असल्याचे स्पष्टपणे ओळखले. त्यांच्या दृष्टीने स्वातंत्र्य म्हणजे फक्त सत्ता नव्हे, तर समाजाचा आत्मसन्मान, सांस्कृतिक अस्मिता आणि मूल्यनिष्ठ जीवन होते.

महाराणा प्रताप यांची सामाजिक भूमिका त्यांच्या प्रजाभिमुख नेतृत्वातून स्पष्टपणे दिसून येते. त्यांनी स्वतःला कधीही प्रजेपेक्षा श्रेष्ठ मानले नाही. राजा म्हणजे ऐश्वर्य उपभोगणारा नव्हे, तर समाजाच्या दुःखात सहभागी होणारा सेवक असतो, हा विचार त्यांनी आपल्या कृतीतून अधोरेखित केला. संकटाच्या काळात त्यांनी राजवाडे, सुखसोयी आणि वैभवाचा त्याग करून आपल्या प्रजेबरोबर जंगलात, डोंगरदऱ्यांत कष्टाचे जीवन स्वीकारले. हा त्याग केवळ व्यक्तिगत नव्हता, तर समाजाशी असलेल्या त्यांच्या अतूट नात्याचे प्रतीक होता. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, हे नेतृत्व ‘लोककेंद्रित सत्तेचे’ आणि ‘सामाजिक जबाबदारीच्या राजसत्तेचे’ उत्कृष्ट उदाहरण ठरते.

हल्दीघाटीच्या युद्धानंतर महाराणा प्रताप यांचे आयुष्य अत्यंत कष्टमय झाले. अन्नधान्याची टंचाई, आर्थिक अडचणी, सततचा संघर्ष आणि मुघल सत्तेचा दबाव असूनही त्यांनी आपल्या प्रजेचा त्याग केला नाही. उलट, या प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी समाजाला धैर्य, आशा आणि आत्मसन्मानाची जाणीव करून दिली. जंगलात राहून त्यांनी जे कष्टाचे जीवन जगले, ते समाजासाठी प्रेरणादायी ठरले. त्यांच्या जीवनातून समाजाला हे समजले की स्वातंत्र्य टिकवण्यासाठी त्याग, संयम आणि संघर्ष अपरिहार्य असतो.

महाराणा प्रताप यांच्या सामाजिक कार्याचा एक अत्यंत महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांचा आदिवासी समाजाशी असलेला घनिष्ठ संबंध. त्या काळात आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहापासून दूर ठेवले जात होते आणि त्यांच्याकडे दुय्यम दृष्टिकोनातून पाहिले जात होते. परंतु महाराणा प्रताप यांनी या समाजाला स्वराज्याच्या संघर्षात समान भागीदार मानले. आदिवासी समाजाने महाराणा प्रताप यांना जंगलात अन्न, निवारा, मार्गदर्शन आणि संरक्षण दिले. हे नाते परस्पर सन्मान, विश्वास आणि समानतेवर आधारित होते. महाराणा प्रताप यांनी आदिवासी समाजाच्या श्रमशीलतेचा, निष्ठेचा आणि स्वातंत्र्यप्रिय स्वभावाचा सन्मान केला. त्यामुळे समाजातील वंचित घटक स्वराज्याच्या लढ्यात सक्रिय सहभागी झाले



आणि सामाजिक समावेशनाचा एक आदर्श निर्माण झाला.

स्वावलंबन ही महाराणा प्रताप यांच्या सामाजिक विचारांची केंद्रस्थानी असलेली संकल्पना होती. मुघल सत्तेने मेवाडवर आर्थिक नाकेबंदी केली तेव्हा राज्यात दारिद्र्य, उपासमारीची आणि असुरक्षिततेची परिस्थिती निर्माण झाली. अशा वेळी परकीय सत्तेकडून मदत स्वीकारण्याऐवजी महाराणा प्रताप यांनी स्थानिक साधनसंपत्तीचा उपयोग करण्यावर भर दिला. जंगलसंपत्ती, शेती, पशुपालन, हस्तकला आणि स्थानिक उद्योग यांच्या माध्यमातून समाजाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. हा दृष्टिकोन केवळ आर्थिक नव्हता, तर सामाजिक आत्मनिर्भरतेचा आणि स्वाभिमानाचा पाया घालणारा होता. पुढील काळातील स्वदेशी चळवळीच्या विचारांचे बीज या धोरणात दिसून येते.

महाराणा प्रताप यांच्या जीवनातील नैतिक मूल्ये त्यांच्या सामाजिक कार्याचा कणा होती. त्यांनी युद्धातही मानवी मूल्यांचे उल्लंघन केले नाही. स्त्रिया, मुले आणि सामान्य नागरिक यांच्यावर अन्याय होणार नाही, याची त्यांनी विशेष काळजी घेतली. युद्ध जिंकण्यासाठी अनैतिक मार्गांचा अवलंब करणे त्यांनी नाकारले. शत्रूशी लढताना देखील नीती, प्रामाणिकपणा आणि सन्मान यांचा त्याग त्यांनी केला नाही. समाजाला त्यांनी हे शिकवले की उद्दिष्ट कितीही महान असले तरी साधने शुद्ध आणि नैतिक असली पाहिजेत.

स्त्रियांच्या सन्मानाबाबत महाराणा प्रताप यांची भूमिका अत्यंत प्रगत आणि संवेदनशील होती. त्या काळात स्त्रियांना युद्धकैदी बनवणे, अपमानित करणे किंवा त्यांच्यावर अत्याचार करणे सामान्य मानले जात असताना महाराणा प्रताप यांनी अशा कृत्यांना ठाम विरोध केला. स्त्री ही समाजाची आधारस्तंभ आहे, तिचा सन्मान म्हणजे समाजाचा सन्मान आहे, ही भावना त्यांच्या धोरणांतून आणि कृतीतून स्पष्टपणे व्यक्त होते. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, ही भूमिका स्त्री-सन्मान आणि मानवी हक्कांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची ठरते.

महाराणा प्रताप यांनी शिक्षण, संस्कार आणि सांस्कृतिक परंपरा यांना देखील महत्त्व दिले. त्यांनी आपल्या कुटुंबात आणि सहकाऱ्यांमध्ये शौर्याबरोबरच नीतिमूल्ये, समाजनिष्ठा आणि देशभक्तीचे संस्कार रुजवले. त्यांच्या पुत्र महाराणा अमरसिंह यांच्यात दिसणारी स्वाभिमानाची, लोककल्याणाची आणि संघर्षशीलतेची भावना ही महाराणा प्रताप यांच्या संस्कारांचीच देणगी होती. सामाजिक नेतृत्वाची ही परंपरा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचली आणि मेवाडच्या स्वाभिमानाची ज्योत अखंड प्रज्वलित राहिली.

महाराणा प्रताप यांचे सामाजिक कार्य केवळ मेवाडपुरते मर्यादित नव्हते. त्यांच्या संघर्षामुळे संपूर्ण भारतीय समाजाला स्वातंत्र्य, स्वाभिमान आणि सांस्कृतिक अस्मितेचे महत्त्व पटले. त्यांनी दाखवलेला मार्ग म्हणजे अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचा, पराभव न मानण्याचा आणि समाजहित सर्वोच्च मानण्याचा मार्ग होता. त्यामुळे महाराणा प्रताप हे केवळ इतिहासातील योद्धे न राहता लोकनायक ठरले. त्यांच्या जीवनकथेतून समाजाला संघर्षाची दिशा आणि मूल्यांची जाणीव मिळाली.

आजच्या काळात महाराणा प्रताप यांचे स्मरण करताना त्यांचे सामाजिक विचार अधिकच समर्पक वाटतात. आजही समाज आर्थिक विषमता, सामाजिक अन्याय, सांस्कृतिक आक्रमण आणि नैतिक अधःपतनाला सामोरे जात आहे. अशा वेळी महाराणा प्रताप यांचे जीवनकार्य आपल्याला मूल्यांवर आधारित संघर्षाची प्रेरणा देते. त्यांनी शिकवले की खरा पराभव हा तलवारीने नव्हे, तर आत्मसन्मान गमावल्याने होतो. समाजासाठी जगणे, अन्यायाविरुद्ध उभे राहणे आणि मूल्यांशी तडजोड न करणे, हा त्यांचा वारसा आहे.

महाराणा प्रताप यांचे संपूर्ण जीवन म्हणजे सामाजिक जबाबदारीची, त्यागाची आणि लोककल्याणाची जिवंत गाथा होती. त्यांनी सत्ता, संपत्ती आणि वैभवापेक्षा समाजाचे हित मोठे मानले. त्यांच्या त्यागातून आणि संघर्षातून समाजाला स्वातंत्र्याचा खरा अर्थ कळला. म्हणूनच महाराणा प्रताप यांचे स्मरण म्हणजे केवळ इतिहासाचे स्मरण नसून सामाजिक मूल्यांची पुनःप्रतिष्ठा होय.


स्मृतीदिनानिमित्त महाराणा प्रताप यांना अभिवादन करताना आपण त्यांच्या जीवनातून स्वाभिमान, सामाजिक न्याय, समता, स्वावलंबन आणि लोककल्याणाची प्रेरणा घ्यायला हवी. महाराणा प्रताप हे तलवारीपेक्षा मूल्यांवर विश्वास ठेवणारे, समाजासाठी जगणारे आणि इतिहासाला दिशा देणारे महान व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या विचारांची आणि कार्याची उज्ज्वल परंपरा जपणे, हेच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

**- डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

# निरोगी जीवनासाठी ध्यान करा

मी निरोगी आयुष्य जगत आहे कां? माझी जीवनशैली निरोगी आहे कां? मी माझ्या जीवनशैलीचा स्तर कसा उंचावू शकतो? असा प्रश्न कधी ना कधी आपल्याला पडतोच, नाही कां? तुम्ही जगत असलेल्या जीवनावरून तुमची जीवनशैली ठरते.

असे काहीतरी नक्की आहे ज्याच्यामुळे तुमच्या निरोगी जीवनशैलीचा स्तर उंचावू शकतो आणि ते म्हणजे “ध्यान”. निरोगी जीवनशैलीचे काही पैलू आणि त्यावर ध्यान कसे लाभप्रद ठरू शकते ते पाहू.



**१. निरोगी आहार :** माझ्या आहारात पोषक घटक किती असतात? नेहमी मी शरीराला गरजेपेक्षा कमी-जास्त आहार घेतो कां?

आहार हा ऊर्जेचा महत्त्वाचा स्त्रोत आहे. म्हणून योग्य वेळेला, योग्य पोषक घटक असणारा, योग्य प्रमाणात आहार घेणे यावर आपले दीर्घकालीन आरोग्य ठरत असते. बऱ्याच वेळा आपल्या जिभेचे चोचले पुरवण्यासाठी आपण पोषक आहार घेणे टाळत असतो. खूप लोकांचा अनुभव असा आहे कि सातत्याने ध्यानाच्या सरावामुळे पोषक आहार घेणे बऱ्याच वेळा सोपे झाले आहे.

**२. आपल्या झोपेची गुणवत्ता आणि कालावधी :** अनेक तासांच्या झोपेनंतरही मी आळसावालेला असतो कां? दिवसभरात मी किती तास झोपतो? जेंव्हा तुम्ही थकलेले असता, पहिला विचार काय येतो ‘एक छानपैकी डुलकी काढावी’. सात-आठ तासांच्या झोपे बरोबरच ती झोप किती गाढ होती, हे देखील तुमच्या सर्वांगीण आरोग्यासाठी महत्त्वाचे आहे. ध्यानाने तुमच्या झोपेची गुणवत्ता वाढते, ती कशी? शांत झोप न लागण्याचे महत्त्वाचे कारण आहे, ताण-तणाव. सततच्या ध्यानामुळे ताण-तणाव निर्माण करणाऱ्या संप्रेरकांची घट होते. त्यामुळे मन शांत होऊन गाढ आणि आरामदायी झोप लागते.

**३. कार्यमग्न रहा :** कितीवेळा मला शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या थकल्यासारखे वाटते? दिवसभरात किती वेळा मला नैसर्गिकरित्या कार्यक्षम आणि आनंदी वाटते? दिवसभरात कितीतरी गोष्टी करायच्या असतात नां? साहजिकच त्या सगळ्या गोष्टी आपण आपल्या क्षमतेपेक्षा चांगल्या करू इच्छितो नां? काही दिवस आपण कार्यक्षम तर काही दिवस आळसावलेले असतो. सतत ध्यानाचा सराव करणाऱ्यांचे असे म्हणणे आहे कि, “ध्यानामुळे ते दिवसभर कार्यक्षम आणि आनंदी रहातात.” जरी त्यांना थकून गळून गेल्यासारखे वाटले तरी काही मिनिटांच्या ध्यानामुळे ते पुन्हा ताजेतवाने होतात.

**४. स्वतःसोबत काही काळ रहा :** दिवसभरात मला आवडणाऱ्या आणि विश्रांती देणाऱ्या किती गोष्टींवर मी किती वेळ घालवतोय? तुमच्या ध्यानात आले आहे कां, जेंव्हा जेंव्हा तुम्ही शरीराला आणि मनाला विश्रांतीसाठी वेळ दिलेला असतो तुमची उत्पादकता वाढते. परंतु नेहमी आपण तक्रार करत असतो कि, ”खूप कामे आहेत, वेळ पुरात नाही” होय नां. स्वतःसोबत रहाण्यासाठी एक उपाय म्हणजे “ध्यान”. डोळे झाकून वीस मिनिटे ध्यानाला बसल्यामुळे मन शांत आणि स्थिर होते. ध्यानाबरोबरच वाचन तसेच पाळीव प्राण्यांशी खेळणे अश्या आवडत्या छंदामुळे आपण ‘स्वतः बरोबर’ राहू शकतो. एक आनंदाची बातमी म्हणजे ध्यानामुळे तुम्ही कार्यक्षम बनता, तुमची हातातील कामे पटापट उरकतात आणि आपसूकच तुम्हाला विश्रांतीसाठी जादा वेळ मिळतो. फ्रांसिस्को म्हणतो, “सातत्याने काम करात राहिल्याने मी लवकरच दमून-कंटाळून जाईन, हे मला माहित आहे. परंतु कामासोबतच जेंव्हा मी ध्यान करतो तोच तो कंटाळवाणेपणा निघून जातो आणि मी माझे काम आनंदाने करू लागतो !”

**५. कार्यपूर्तीचा आनंद :** प्रत्येक सकाळी आपण मिळालेल्या दिवसाकडे कसे पाहतो, कामासाठी मिळालेला दिवस की, “ बापरे! आणखी एक दिवस काम.” पहा नां, आपण आपले काम केंव्हा आनंदाने करतो ? जर ते काम तुमच्या आवडीचे असेल तेंव्हाच. कारण जेंव्हा तुम्ही ते पूर्ण करता तेंव्हा समाधान मिळते. आणि ते समाधानच तुम्हाला आनंदी बनवते. आता हे कसे प्राप्त करू शकतो? उत्तर आहे ‘ध्यान’. सोपे सूत्र आहे- ध्यानामुळे एकाग्रता वाढते, एकाग्रतेमुळे-कार्यक्षमता, कार्यक्षमतेमुळे-उत्पादकता, उत्पादक्तेमुळे- कार्यपुर्तीचा आनंद वृद्धिंगत होतो.

**६. सामाजिक आरोग्य :** मला किती मित्र आहेत? माझे त्यांच्या सोबतचे नाते संबंध कसे आहेत? मी माझ्या मित्रांची संख्या वाढवतो आहे कि उलट घटवतो आहे ?

‘मानव हा सामाजिक प्राणी आहे’, हे आपणास माहित आहे नां. आपले सामाजिक आरोग्य देखील आपल्या चांगल्या आरोग्यासाठी महत्त्वाचे आहे. ‘आपण समाजात कसे रहातो’ यावर ते अवलंबून आहे,ज्यांच्या बरोबर आपण आपली सुख-दुःखे वाटू शकतो अश्या व्यक्ती आपल्या आजूबाजूला असणे, चांगले असते ना ! जेंव्हा गरज भासते तेव्हा आपण समाजाकडूनच मदतीची अपेक्षा करतो, बरोबर? चांगला समाज कसा मिळवू शकतो ? समाजप्रियता आणि मित्रत्त्वाचे संबंध असणे हे आपल्या स्वभावात आहे. परंतु यांच्या वृद्धीसाठी देखील प्रयत्न करावे लागतात. ध्यानामुळे इतरांना स्वीकारण्याची क्षमता वाढते. ध्यानामुळे सुसंवाद आणि अभिव्यक्त होण्याची क्षमता वाढते. या सर्वामुळे आपापसात बांधिलकी वाढते आणि चांगल्या नातेसंबंधांची जोपासना होते.

**७. आजारी पडण्याचे प्रमाण घटणे :** तुम्ही कितीवेळा आजारी पडता ? ध्यानाच्या सरावामुळे आपली रोग-प्रतिकार शक्ती वाढून आजारी पडण्याच्या प्रमाण, शक्यता कमी होतात. तसेच ध्यानाच्या सरावामुळे आजारानंतर आरोग्याची पुनः प्राप्ति झपाट्याने होऊ लागते.

**ध्यानासाठी सूचना:**

आपण सर्वजण नैसर्गिकरीत्या निरोगी राहू इच्छितो, होय नां? वर उल्लेख केलेल्या घटकांवर चिंतन करत रहा. त्यामुळे, ध्यानामुळे होणाऱ्या सकारात्मक बदलांचा अनुभव मिळणेस मदत होईल. दिवसातून एकदा तरी ध्यान करणे गरजेचे आहे.

“ध्यान” तुमचे तुम्हीच सुरु करू शकता किंवा “ध्यान” तज्ञाकडून शिकून घेऊ शकता. ध्यानाचा गहन अनुभव प्राप्त होण्यासाठी तज्ञ तुम्हाला मार्गदर्शन करतील. तुम्ही एक ध्यान-मित्र करू शकता ज्याच्याबरोबर तुम्ही ध्यान करू शकाल. ध्यान-मित्र केल्याने तुमचे ध्यान नियमित होईल.

# हिडन जेम ऑफ महाराष्ट्र – टिपेश्वर वन्यजीव अभयारण्य



टिपेश्वर व्याघ्र प्रकल्प हे महाराष्ट्रातील एक अद्याप पूर्णपणे प्रसिद्ध न झालेले, पण वाघांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे आणि आकर्षक पर्यटन स्थळ आहे. हे यवतमाळ जिल्ह्यातील पांडरकवडा (Pandharkawada) तालुक्यात वसलेले आहे आणि ते व्याघ्र प्रकल्प म्हणून अधिकृतपणे घोषित झालेले नाही, पण टिपेश्वर वन्यजीव अभयारण्य म्हणून ओळखले जाते. येथे वाघांची संख्या झपाट्याने वाढत असल्याने पर्यटकांसाठी हे हिडन जेम (लपलेले रत्न) ठरले आहे.

**मुख्य माहिती**

क्षेत्रफळ — १४८.६३ चौरस किलोमीटर

स्थापना — ३० एप्रिल १९९७ (वन्यजीव अभयारण्य म्हणून)

स्थान — यवतमाळ जिल्हा, महाराष्ट्र (तेलंगणातील कावल व्याघ्र प्रकल्प आणि ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाशी जोडलेला व्याघ्र कॉरिडॉर)

हे अभयारण्य तेलंगणाच्या सीमेवर असल्याने ताडोबा, पेंच, नागझिरा इत्यादी व्याघ्र प्रकल्पांमधील वाघ येथे स्थलांतर करतात. यामुळे वाघांची संख्या २०१० मध्ये फक्त ३ होती, ती आता सुमारे २०+ (प्रौढ, उप-प्रौढ आणि पिल्ले) पर्यंत पोहोचली आहे. येथील प्रसिद्ध वाघिणी अवनी (जिच्यावर 'शेरनी' चित्रपट आधारित आहे) यामुळेही हे ठिकाण ओळखले जाते.

**१८ ते २० वाघांची उपस्थिती**

सुमारे १४८ चौरस किलोमीटर क्षेत्रात पसरलेल्या या अभयारण्यात सध्या १८ ते २० वाघ असल्याचा अंदाज आहे, ज्यात चार लहान वाघांचे पिल्लू आहेत. मुबलक वनक्षेत्र, पाण्याचे स्रोत आणि शिकार उपलब्ध असल्याने येथे वाघांचे संवर्धन प्रभावीपणे केले जात आहे. म्हणूनच येथे वाघ दिसण्याची शक्यता खूप जास्त मानली जाते.

**सुन्ना आणि कोदोरी - दोन महत्त्वाचे प्रवेशद्वार**

पर्यटकांच्या सोयीसाठी, अभयारण्यात सुन्ना आणि कोदोरी हे दोन प्रमुख दरवाजे विकसित करण्यात आले आहेत. दोन्ही दरवाज्यांमधून जंगल सफारी उपलब्ध आहेत. या दरवाज्यांवर एकूण २५ जिप्सी तैनात करण्यात आले आहेत, ज्यामुळे जंगलात सुरक्षित आणि सुव्यवस्थित भेट दिली जाते.

**वनस्पती आणि प्राणीजीवन-**

वनस्पती मुख्यतः टीक (सागवान) वन, बांबूचे जंगल (सुमारे २५० प्रजाती), रेड सँडलवुड, औषधी वनस्पती.

तसेच प्राणी रॉयल बंगाल टायगर (वाघ), लेपर्ड (बिबट्या), स्लॉथ बेअर (अस्वल), चारशिंग अस्वल, निलगाय, सांभर, चितळ, जंगली डुक्कर, लंगूर, हायना, जॅकल.

पक्ष्यांपैकी १२५+ प्रजाती (मोर, विविध पक्षी).

सरीसृपाचे २२+ प्रजाती (कोबरा, पायथन, व्हायपर इ.).

पाहण्यासाठी सर्वोत्तम वेळ — ऑक्टोबर ते फेब्रुवारी (थंडी आणि उत्तम दृश्यता); मार्च-जूनमध्ये वाघ दिसण्याची शक्यता जास्त (पाण्याच्या ठिकाणी).

**कसे पोहोचाल?**

नजीकचे शहर पांडरकवडा (NH-44 वर).

रेल्वे मार्ग — अमरावती/बडनेरा (१६५ किमी), नागपूर (१५०+ किमी).

हवाई मार्ग — नागपूर विमानतळ (सर्वात सोयीस्कर).

रस्ता मार्ग — हैदराबादपासून ६.५ तास, नागपूरपासून ४-५ तास.

येथील सफारीत वाघ, बिबट्या आणि इतर प्राण्यांचे दर्शन घडते. टिपेश्वर हे निसर्गप्रेमी आणि वन्यजीव प्रेमींसाठी एक उत्तम पर्याय आहे. जर तुम्ही शांत आणि अस्सल जंगल अनुभव हवा असेल तर येथे नक्की भेट द्या!